PCNTDA
सेवा श्रद्धासमन्विता

## माहितीपत्रक

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी.

नवीन प्रशासकीय भवन, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,

आकुर्डी, पुणे-४४.

दुरध्वनी क्रमांक - (०२०) २७१६६०००

२७६५२९३४/२७६५२९३५

(विस्तारित क्रमांक ११०१/११०९/१११३)

## भू-विभाग

पेठ क्र. **७** मधील भूखंड क्र. **२८** व **१३२** तसेच पेठ क्र. **१०** मधील भूखंड क्र. **२८** या औद्योगिक भूखंडांची निविदा पध्दतीने ९९ वर्षाचे भाडेपट्टा तत्वावर वाटप करावयाच्या ई- निविदेच्या अटी व शर्ती

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे - ४११०४४.
दुरध्वनी क्रमांक. (०२०) २७१६६००० (विस्तारीत ११०२/११०३/११०९)

## ई- निविदा सुचना क्रमांक भू- ०७ ते ०९ सन २०१९-२०

प्राधिकरणातील पेठ क्र.७ मधील औदयोगिक भूखंड क्र.२८ व १३२ व पेठ क्र.१० भू. क्र.२८ चे वाटप ९९ वर्षाचे भाडेपट्टा तत्वावर वाटप करणेकामी, टेंडर डॉक्युमेंटमध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत पात्रता धारण करणाऱ्या इच्छूक निविदाधारकांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

औदयोगिक भूखंडाच्या ई-निविदा वाटप योजनेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | काम सुरू दिनांक | वेळ | अंतिम दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑन लाईन निविदा जाहिरात प्रसिद्धी | १४/०१/२०२० | | | |
| २ | कागदपत्र डाऊनलोड करणे | १४/०१/२०२० | १०:०० वा. | १४/०२/२०२० | १८.०० वा. |
| ३ | निविदापुर्व बैठक | २१/०१/२०२० | १५:०० वा. | | |
| ४ | निविदा सादर करणे | १४/०१/२०२० | १०:०० वा. | १४/०२/२०२० | १८.०० वा. |
| ५ | निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा) | १८/०२/२०२० | ११:०० वा. | | |
| ६ | टिप : निविदा अर्ज शुल्क व बयाणा रक्कम फक्त नेट बँकींगद्वारे ई पेमेंट पद्धतीने स्विकारले जाईल. SB MOPS व इतर इंटरनेट बँकींगचा वापर करणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन पेमेंट चार दिवस आधी करावे. | | | | |

**सूचना :**

अ. ई-निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र व्यक्ती / संस्था यांनी ई -निविदा पोर्टल **"https://mahatenders.gov.in"** वर नोंदणी करणे सक्तीचे असून त्यांना लागू असणाऱ्या आवश्यक त्या प्रवर्गाच्या पॅनलवर स्वत:ची नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

ब. निविदाधारकांना ई -निविदा भरताना अधिक तपशील आवश्यक असल्यास अथवा कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी **२४ x ७ टोल फ्री क्रमांक १८००-३०७०-२२३२ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९१-७८७८००७९७२ किंवा ९१-७८७८००७९७३ वर संपर्क साधावा.**

क. सर्व निविदाधारकांनी निविदेसंबंधी सर्व कागपत्रे ऑनलाईनच सादर करणे बंधनकारक आहे . पोस्टाने, अथवा व्यक्तीश: पाठविण्यात येणारी निविदा स्वीकारली जाणार नाही. निविदाधारकांकडून ऑनलाईन निविदा प्राप्त न झाल्यास निविदा उघडली जाणार नाही.

ड. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाचा राहील.

इ. सविस्तर अंटी व शर्ती, पोर्टलवर पहावयास उपलब्ध आहेत.

फ. सदर निविदा सूचना "**www.pcntda.org.in**" या संकेत स्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
पिं.चिं.न.वि.प्रा., आकुर्डी

**<u>पेठ क्र. ७ भूखंड क्र. २८ व १३२ तसेच पेठ क्र.१० , भूखंड क्र. २८ या औद्योगिक भूखंडाची निविदा पध्दतीने भाडेपट्टा तत्वावर वाटप निविदेच्या अटी व शर्तीचे माहितीपत्रक</u>**

**(विशेष सूचना : सदर माहिती पत्रकातील निविदा अर्ज, अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचून निविदा अर्ज भरावा. नंतर याबाबत कोणतीही तक्रार आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.)**

**१) <u>प्रस्तावना :</u>**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकसित पेठ क्र. ७ भूखंड क्र. २८ व १३२ तसेच पेठ क्र.१० , भूखंड क्र. २८ ही औद्योगिक प्रयोजनार्थ आरक्षित भूखंडाची Online निविदा पध्दतीने ९९ वर्षांच्या भाडेपट्टा तत्वावर वाटप योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. प्राधिकरणाच्या पेठ क्र. ७ व १० मधील अंदाजे ६५० औद्योगिक भूखंडांची वाटप यापुर्वीच पुर्ण करण्यात आले असुन बहुसंख्य भूखंडधारकांनी त्याठिकाणी उद्योग / व्यवसाय सुरु केले आहेत. या पेठेतील परिशिष्ठ -१ मध्ये नमूद केलेले भूखंड, या वाटप योजनेत ई-निविदा पध्दतीने ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने वाटप करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहेत. या योजनेव्दारे विक्रीसाठी प्रस्तावित असलेल्या औद्योगिक भूखंडाची, इच्छुक व्यक्तींनी समक्ष पाहणी करुन या जागांसाठी त्यांच्या सर्वात अधिकत्तम दरांची निविदा Online सादर करावयाची आहे. प्रस्तुत योजनेतील भूखंड वाटपास प्राधिकरण भूवाटप नियम १९७३ व सक्षम नियोजन प्राधिकारी यांच्या तरतूदी बंधनकारक असतील. वाटप योजनेतील भूखंडाचा तपशिल स्वतंत्रपणे सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये देण्यात आला आहे.

**यासाठी सादर करावयाच्या निविदा अर्जाची किंमत रु. ५,०००/- (अक्षरी रु.पाच हजार फक्त) असून सदरची रक्कम परत केली जाणार नाही.**

**२) <u>जमीन वापर</u> :**

या वाटप योजनेतील भूखंड <u>प्रदुषणविरहीत औद्योगिक प्रयोजनासाठी</u> आरक्षित आहेत. त्याचा वापर त्याच प्रयोजनार्थ करावा लागेल. असा वापर करताना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे निकषाप्रमाणे प्रदुषण विरहित उद्योगांसाठीच करता येईल. सदर भूखंडाचा रासायनिक स्वरुपाच्या औद्योगिक प्रकल्पासाठी वापर करता येणार नाही. सदर भूखंडावर बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र घेण्यापूर्वी प्रदुषण मंडळाकडून आपला उद्योग प्रदुषण विरहीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**३) <u>प्रकल्प अहवाल</u> -**

**प्रस्तुत योजनेतील भूखंड औद्योगिक प्रयोजनार्थ वापरावयाचा असल्याने आपल्या औद्योगिक प्रयोजनाचा मंजूरीबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून मंजूर प्रकल्प अहवालाचा संच सोबत जोडावा लागेल. या प्रकल्प अहवालामध्ये उत्पादनाचे स्वरुप / कालावधी / कर्मचारी वर्ग / विद्युत पुरवठा मागणी / पाणी पुरवठा मागणी / प्रकल्पाचा आर्थिक तपशिल / कच्चा माल पुरवठा / विक्री इत्यादी माहितीसह प्रकल्प अहवाल, मान्यताप्राप्त प्रकल्प अहवाल तपासणी करणाऱ्या व्यक्तीने (Chartered Accoutant ने) प्रमाणित केलेला असला पाहिजे.**

४) **<u>निविदा सादर करणे</u>** :

१. सदर जाहिरात नमूद केलेल्या मुदतीत व वेळेमध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाच्या संकेतस्थळावर (**www.pcntda.org.in**) पाहता येईल.

२. **फॉर्म फी व बयाणा रक्कम e-payment gate-way mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे बँकेत जमा करावी.**

३. औद्योगिक भूखंड भाडेपट्टा तत्वावर वाटप करता ई-निविदा प्रद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा (१) **तांत्रिक लिफाफा** व (२) **वाणिज्य लिफाफा** या पद्धतीने अपलोड करावी.

५) **<u>निविदा अर्ज भरणे</u>** :

१. निविदा अर्जात बिनचूक माहिती भरणे आवश्यक आहे. चुकीची वा अर्धवट माहिती भरल्यास व निविदा ग्राह्य न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.

२. **आवश्यक तेथे आकडे अंकात व अक्षरात लिहावे.**

३. निविदा अर्ज भरण्यापूर्वी मागणी करावयाचा भूखंड व त्याचा आजूबाजूचा परिसर, क्षेत्रफळ समक्ष पहावे. भूखंड आहे त्या स्थितीत वाटप करावयाचे आहे, हे पाहूनच दर नमूद करावा. नंतर या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

४. निविदाधारकाने आपला संपूर्ण पत्ता दुरध्वनी क्रमांकासह निविदेमध्ये लिहावा. या पत्त्यावर पाठविलेले पत्र निविदाधारकास मिळाले आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

५. सर्व कागदपत्रे सुस्पष्ट दिसतील अशा पद्धतीने अपलोड करावीत.